SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX - 2609000 GRAM : UNISHIVAJI
FAX : ००९१-०२३१-२६९१५३३ & ००९१-०२३१-२६९२३३३
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
दूरध्वनी (ईपीएबीएक्स) २६०९००० (संलग्नता विभाग - २६०९०८९, २६०९०९०)
तार : युनिशिवाजी फॅक्स : ००९१-०२३१-२६९१५३३ व २६९२३३३.
Website : www.unishivaji.ac.in e-mail : affiliationt1@unishivaji.ac.in

B
Accredited By NAAC

एसयु/संलग्नता विभाग /२०१३-१४/ No 44 दिनांक : 26 JUN 2013

स्मरणपत्र - ०१

**प्रति,**
**मा.प्राचार्य/संचालक,**
सर्व संलग्नित महाविद्यालये व
मान्यता प्राप्त शिक्षण संस्था.

**विषय :- सी.एम.जे. विद्यापीठ, सिलाँग (मेघालय) येथून देण्यात आलेल्या बनावट पीएच.डी पदवी आधारे राज्यातील विविध विद्यापीठ व महाविद्यालयामध्ये करण्यात आलेल्या नेमणूका.**

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, उंच व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून ई-मेल द्वारा प्राप्त झालेले दि.०३/०६/२०१३ रोजीचे पत्र.
२) या कार्यालयाचे एसयु/संलग्नता विभाग/२०१३-१४/२२, दि.०४/०६/२०१३ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भीय पत्रास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या सेवेत अध्यापक या पदावर सी.एम.जे. विद्यापीठ, मेघालय किंवा इतर खाजगी विद्यापीठे येथून पीएच.डी ही पदवी धारण करुन सेवेत रुजू झालेल्या व सेवेत कार्यरत असताना पीएच.डी धारण करुन, त्याअनुषंगाने वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणीत, निवड झालेल्या अध्यापकांची माहिती व खालील कागदपत्रे या कार्यालयास त्वरीत सादर करावीत.

१. संबंधित अध्यापकांचे पदवी व पदव्युत्तर पदवी गुणपत्रिका सत्यप्रत.
२. संबंधित अध्यापकांचे पदवी व पदव्युत्तर पदवी (Degree) ची सत्यप्रत.
३. पीएच.डी पदवीची सत्यप्रत.
४. विद्यापीठ विहित निवड समितीच्या अहवालाची सत्यप्रत.
५. विद्यापीठाने मान्यता दिलेल्या पत्राची सत्यप्रत.
६. विद्यापीठाने चेंजिस-इन-स्टाफ फॉर्मला मान्यता दिलेल्या पत्राची/प्रपत्राची सत्यप्रत.
७. वरिष्ठ श्रेणी/निवड श्रेणी निवड झालेली माहिती.
८. आपल्या महाविद्यालयातील पीएच. डी. धारक अध्यापकांनी सी.एम.जे. विद्यापीठ व इतर खाजगी विद्यापीठाकडून पीएच. डी. साठी मार्गदर्शक म्हणून मान्यता घेतली असल्यास त्याची माहिती तसेच या पीएच. डी. मार्गदर्शकाकडे पीएच. डी. साठी नोंदणी झालेल्या उमेदवारांची नावासह संपूर्ण तपशील.

तरी सी.एम.जे. विद्यापीठातून पीएच.डी पदवी धारण केलेल्या अध्यापकांची माहिती तात्काळ ई-मेल/फॅक्सद्वारे या कार्यालयास सादर करावी. तसेच अशी माहिती निरंक असलेस तसा अहवाल त्वरीत पाठवावा. सदरची माहिती सादर करण्याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य/संचालक म्हणून आपली राहील, याची नोंद घ्यावी ही विनंती.

**सदरची माहिती शासनास वेळेत सादर करावयाची असल्याने प्राध्यान्याने ही माहिती पाठवावी.**

कळावे,

आपला विश्वासू

संचालक
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

टीप :- सदरचे पत्र www.unishivaji.ac.in या संकेत स्थळावर BCUD-Circular या ठिकाणी उपलब्ध आहे.

**ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठास माहिती सादर केलेली नाही, अशाच महाविद्यालयांना सदरचे पत्र लागू राहील.**